**मुख्य कार्यालय, विरार**

**विरार (प),**

**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०४/०८/२०२६

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

***ऐतिहासिक जंजिरे वसई किल्ला व परिसरात वसई-विरार महानगरपालिकेची विशेष स्वच्छता मोहीम***

वसई विरार शहर महानगरपालिकेचे मा.महापौर श्री.अजीव पाटील व मा.आयुक्त श्री.पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वसई-विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जंजिरे वसई किल्ला व परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे.

मागील १० दिवसांपासून सुरु असलेल्या या स्वच्छता मोहिमेत महानगरपालिका प्रभाग समिती 'आय' घनकचरा विभागाच्या मुख्य आरोग्य निरीक्षक प्रविणा कदम व कनिष्ठ आरोग्य निरीक्षक उमेश आडे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभागातील स्वच्छता दूतांमार्फत नियोजनबद्ध पद्धतीने किल्ला व परिसर साफसफाईची कामे करण्यात आली. आज सकाळी ७ ते दुपारी १ यावेळेत एकूण १५ कर्मचारी वर्गाने विशेष स्वच्छता मोहीम राबवून जंजिरे वसई किल्ल्याचा बंदर दर्या दरवाजा, श्री हनुमंत मंदिर परिसर, बंदर विहीर आवार, धान्य कोठार परिसर, चौकी परिसर अत्यंत जिद्दीने झाडीतून मोकळा केला. यावेळी मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या काटेरी झूडुपे, अनावश्यक झाडी, गवत, वेली यांची स्वच्छता करण्यात आली. येथील मुख्य वास्तूला, पुरातत्वीय रचनेला, बांधकामाला कोणत्याही प्रकारची इजा न करता आज संवर्धनासाठी सर्वोत्तम योगदान देण्यात आले. आजच्या विक्रमी स्वच्छता मोहिमेने पर्यटकांना स्थळांचे दर्शन होणे व मुक्त संचार करणे सोपे झाले आहे. यापुढेही ही स्वच्छता मोहीम सुरूच राहणार आहे.

ऐतिहासिक जंजिरे वसई किल्ला हा राज्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक पर्यटनस्थळांपैकी एक असून येथे दररोज स्थानिकांसह राज्यातील तसेच देश-विदेशातील मोठ्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. किल्ल्यातील प्राचीन वास्तू, तटबंदी, मंदिरे, चर्च आणि अन्य ऐतिहासिक अवशेष हे वसईच्या समृद्ध इतिहासाचे प्रतीक आहेत. सदर वास्तू व परिसर हे मराठा इतिहास, पोर्तुगीज स्थापत्यकला आणि सांस्कृतिक वारसाचे प्रतीक आहेत. या ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याबरोबरच पर्यटकांना स्वच्छ, सुरक्षित व आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सदर स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती. वसई-विरार शहर महानगरपालिका शहरातील ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळांची स्वच्छता, संवर्धन आणि सौंदर्यीकरण यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. पर्यटनाला चालना मिळावी, पर्यटकांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ व्हावी तसेच शहराची स्वच्छ व सकारात्मक प्रतिमा निर्माण व्हावी, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका पालिकेचे माननीय महापौर, माननीय आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.नगरसेवक, महानगरपालिका घनकचरा विभागाचा कर्मचारी वर्ग, केंद्रीय पुरातत्व विभाग कर्मचारी वर्ग यांच्या प्रयत्नांनी जंजिरे वसई किल्ल्यास नव्याने संवर्धन दिशा प्राप्त झाली आहे. या कार्याची दखल घेत श्रीदत्त राऊत यांच्यामार्फत समस्त किल्ले वसई मोहीम दुर्गमित्र परिवार यांच्याकडून वरील सर्व मान्यवरांच्या प्रयत्नांना मनापासून धन्यवाद व विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

पुढील काळात ही स्वच्छता मोहीम आपले सक्रिय योगदान देत राहणार असून या ऐतिहासिक किल्ल्यास भेट देणाऱ्या नागरिक व पर्यटकांनी किल्ला परिसरात प्लास्टिक अथवा इतर कचरा टाकू नये, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखावी आणि ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.